महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 25 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 267 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# पदे व निधी वाटप; महायुतीत एकमत !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीमध्ये गेल्या तीन महिन्यांपासून रस्सीखेच सुरू असतानाच राज्यामध्ये पदे आणि निधी वाटपाच्या धोरणावर मात्र महायुतीमध्ये अखेर एकमत झाले. या धोरणानुसार जिल्हा विकास निधीचा (डीपीडीसी) ३० टक्के निधी पालकमंत्र्यासाठी राखीव ठेवण्यात आला असून जिल्हा, तालुका किंवा विधानसभा स्तरावरील शासकीय समित्यांमध्ये नियुक्त्यांचे अंतिम अधिकार प्रदेशाध्यक्षांना दिले आहेत. महायुती नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रीपदाचा घोळ अद्याप मिटलेला नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या दोन्ही जिह्यांवर आपला



दावा ठोकला असताना भाजपला नाशिक तर राष्ट्रवादीला रायगडचे पालकमंत्रीपद हवे आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाचा वाट मिटलेला नाही. त्यातच जिल्हा नियोजन व अन्य समित्या, विशेष कार्यकारी अधिकारी (एसईओ) याचे वाटपही रखडलेले होते. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात झालेल्या बैठकीत अखेर निधी, पद वाटपाच्या धोरणावर शिक्कमोर्तब करण्यात आले असून अधिवेशन संपल्यानंतर या नव्या धोरणानुसार जिल्हा, तालुका, विधानसभा मतदार संघातील विविध शासकीय समित्यांवरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या जाणार असल्याची माहिती सरकारमधील सूत्रांनी दिली.

समित्यांमधील नियुक्त्या आणि निधी वाटपाबाबतचे अंतिम अधिकार संबंधित पक्षांच्या प्रदेश अध्यक्षांना आहेत. त्यामुळे अंतिम यादी करण्यापूर्वी प्रदेश कार्यालयात पक्ष प्रमुखांकडून मंजूर करून घेण्याची जबाबदारी पालकमंत्री, आमदारांवर टाकण्यात आल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

## पद, निधीवाटपाचे सूत्र कसे?

- सत्तावाटप सूत्रानुसार जिल्हा, तालुका आणि विधानसभास्तरीय समिती त्यांचे वाटप करताना ज्या ठिकाणी सत्ताधारी पक्षाचा आमदार आहे, त्या ठिकाणी विधानसभास्तरीय समितीमध्ये ६० टक्के व युतीतील दोन्ही पक्ष प्रत्येकी २० टक्के अशा प्रकारे धोरण राहील. तसेच ज्या ठिकाणी सत्तारूढ पक्षाचा आमदार नसेल त्या ठिकाणी दुसऱ्या क्रमांकावर असलेला महायुतीमधील मोठा पक्ष म्हणून ४० टक्के व इतर दोन्हीही पक्षांना प्रत्येकी ३० टक्के पदांचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.
- जिल्हास्तरीय समितीमध्ये पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी ज्या पक्षाचा पालकमंत्री असेल त्यांच्यासाठी ५० टक्के तर युतीतील इतर दोन्ही पक्षांसाठी प्रत्येकी २५ टक्के पदे असतील. तर तालुक्याच्या ठिकाणी ज्यांचा आमदार त्यांना अधिक जागा असे सूत्र ठरविण्यात आले आहे.
- राज्याच्या अर्थसंकल्पात यंदा जिल्हा वार्षिक योजनेमध्ये दोन हजार कोटींची वाढ करून २०,१६५ कोटींची तरतूद करीत सर्व जिल्ह्यांच्या विकास निधीत वाढ करण्यात आली आहे. सरकारमध्ये ठरलेल्या धोरणानुसार जिल्हा विकास निधी वाटप (डीपीडीसी) करताना पालकमंत्र्यासाठी ३० टक्के निधी राखीव असून त्याचे वाटप करण्याचे अधिकार पालकमंत्र्यांना असतील. तर उर्वरित ७० टक्के निधी जिल्ह्यातील आमदारांना समप्रमाणात वाटप केला जाईल.

## थोडक्यात महत्वाचे

### नववर्ष स्वागत यात्रेत जिल्हा परिषदेचा चित्ररथ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – शहरात येत्या रविवारी म्हणजेच गुढीपाडवा आणि मराठी नववर्षाच्या स्वागता निमित्त दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास यांच्या वतीने स्वागत यात्रा निघणार आहे. यंदा या यात्रेचे २५ वे वर्ष असल्यामुळे 'संस्कृतीचा महाकुंभ'यंदाच्या यात्रेत दिसावा अशी अपेक्षा आयोजकांकडून व्यक्त होत असतानाच, यंदा नवनविन संस्था या स्वागत यात्रेसोबत जोडून घेण्यास न्यासाला यश मिळाले आहे. गेले अनेक वर्ष विविध संस्था, महाविद्यालये तसेच शाळांसह ठाणे महापालिकेच्या काही विभागांचे चित्ररथ स्वागत यात्रेत पाहायला मिळायचे. परंतु, यंदाच्या वर्षी या स्वागत यात्रेत पहिल्यांदाच ठाणे जिल्हा परिषदेचा चित्ररथ पाहायला मिळणार आहे. या चित्ररथाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या विविध नाविन्यपूर्ण योजनांची जनजागृती केली जाईल, अशी माहिती जिल्हा परिषदेकडून देण्यात आली.

ठाणे शहराला सांस्कृतिक वारसा लाभला आहे. या शहराची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी विविध संस्था, प्रशासकिय विभाग तसेच लोकप्रतिनिधींच्या मार्फत विशेष प्रयत्न केले जातात. त्यातील एक म्हणजे गेले वर्षानुवर्ष शहरात सुरु असलेली स्वागत यात्रेची परंपरा. ठाण्यातील श्रीकौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास यांच्या वतीने २००१ पासून गुढीवाडवा म्हणजेच मराठी नववर्षाच्या पहिल्या दिवशी स्वागत यात्रा काढली जाते. मराठी संस्कृती, रुढी, परंपरा जपण्याचा प्रयत्न या स्वागत यात्रेच्या मार्फत होत असतो. दरवर्षी या यात्रेसोबत नवनविन संस्था जोडत गेल्या असून आता या यात्रेला भव्य स्वरुप प्राप्त झाले आहे. शहरातील सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था, महाविद्यालये, शाळा तसेच महापालिका प्रशासनाचा देखील या यात्रेत सहभाग असतो. यंदा या यात्रेचे २५ वे वर्षे आहे. त्यामुळे यंदाच्या यात्रेत जास्तीत जास्त संस्थांचा सहभाग वाढावा यासाठी न्यासाकडून विशेष प्रयत्न करण्यात आले आहे. वेळोवेळी संस्थांना करण्यात आलेले आवाहन यामुळे यंदाच्या यात्रेत शहरातील नविन संस्थांचा, शाळांचा आणि महाविद्यालयांचा सहभाग असणार आहे.



### आज केडीएमसीत सफाई मित्र दरबार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या विविध समस्यांचे वेळोवेळी निराकरण करणे आवश्यक आहे. याकामी सफाई कामगारांना मा.आयुक्त महोदया अथवा अन्य अधिका-यांची वेळोवेळी भेट घेऊन त्यांच्या समस्या मांडणे व त्यांचे निराकरण करुन घेणे शक्य होत नाही. त्याअनुषंगाने, प्रत्येक महिन्याच्या चौथ्या मंगळवारी "सफाई मित्र दरबार" आयोजित करण्यात येऊन, त्यावेळी उपस्थित असलेल्या सफाई कामगारांच्या समस्या विचारात घेऊन त्यांचे नियमोचितरित्या निराकरण करणेकामी कामगार कल्याण अधिकारी (प्र.) सुनिल बागुल यांना प्राधिकृत करणेत आलेले आहे.त्याअनुषंगाने उद्या मंगळवार दि. 25 मार्च 2025 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 2.00 या वेळेत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महापालिका भवनातील तळ मजल्यावरील दालनात सफाई मित्र दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे.

# म्हारळ येथे भागवत सप्ताहाचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

म्हारळ येथे भागवत सप्ताह आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक 20 मार्च ते 26 मार्च दरम्यान हा सप्ताह सपन्न होतं असून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव हे या सप्ताहचे आयोजक आहेत. कल्याण तालुका भागवत सप्ताह समिती तर्फे हा सप्ताह सुरु आहे. भागवत कथेत तेत्तीस कोटी देवांचा वास्तव असते. बाल साध्वी राधादेवी वृदावन म्हारळभागवत कथा मानवी जीवनातील व्यथा सपुष्टात आणते. या कथे च्या ठिकाणी तेहत्तीस कोटी देवांचे वास्तव असते. भागवत कथा मानवी जीवनाला दिशा देणारी असते बाल साध्वी राधादेवी वृदावन यांनी आपल्या कथा सारात संत विचारधारा स्पष्ट केली. भागवत कथा मानवी जीवनाला दु:खातून सुखाकडे नेणारी असते. मानवी जीवनाच्या कल्याणसाठी भागवत कथा ऐकणे व ते विचार कृतीत आणणे गरजेचे आहे. या वेळी भागवत क्थेतील मुख्य आशय सांगत त्यांनी कृष्ण जन्म कथा सांगत श्री कृष्णा च्या जीवन पट स्पष्ट केला.

# टीबी मुक्त ग्रामपंचायतींचा २८ कास्य, १३६ रौप्य मानांकनाने सन्मान



## टीबी मुक्त जिल्हा करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहा - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - इ. स. १८८२ साली डॉ. रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञाच्या परिषदेत मांडला व त्यास दि. २४ मार्च रोजी मान्यता मिळवली म्हणून २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दुरीकरणाकरिता विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने जिल्हा क्षयरोग केंद्र, ठाणे कार्यालय अंतर्गत दि. २४ मार्च, २०२५ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियाना अंतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायती म्हणुन निवड करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या निर्देशांकानुसार व सहसंचालक आरोग्य सेवा, क्षय व कुष्ठ पुणे यांचे मार्गदर्शक तत्वानुसार एकूण २८ रोप्य प्रशस्तीपत्र देऊन ग्रामपंचायतींना महात्मा गांधी यांचा पुतळा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या शुभ हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच १२ निक्षय मित्र व ४ टीबी चॅम्पीयन यांना देखील प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हातील एकूण ग्रामपंचायतीमधील 28 कास्य व 136 रोप्य मानांकन देऊन पुढील वर्षी उर्वरित सर्व ग्रामपंचायती ह्या लवकरच सिल्वर मधून सुवर्ण नामांकन प्राप्त करण्यास प्रयन्न करून ठाणे जिल्ह्यात क्षयरोग हद्दपार करूयात, असे आवाहन केले.

कार्यक्रम हा जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालय व जी. एल. आर. ए. इंडिया (जर्मन लेप्रसी एन्ड टी बी रिलीफ असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये एन. के. टी. माध्यमिक ज्युनिअर महाविद्यालयातील 250 मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नर्सिंग टी एन. के. टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची टीबी विषयक चित्रकला, रांगोळीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

तसेच टीबी जनजागृती करिता पथनाट्य नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या समोर सादर केला. जागतिक क्षयरोग दिन नियोजन भवन सभागृह येथे संपन्न झाला असून नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थिनींची क्षयरोग विषयी विविध जनजागृती रॅली आयोजित करून विद्यार्थी रॅली, पथनाट्य, ऑटो मायकिंग, चित्रकला व रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर असे विविध उमक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रम सुरु करण्यात आले असून कार्यक्रमाची प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आशा मुंजाळ यांनी केली.

# करवाढीसाठी उत्पन्नाच्या नव्या साधनांचा विचार

## उल्हासनगर महापालिकेचा अर्थसंकल्प सादर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेचे ९८८ कोटी ७२ लाख रूपये महसुली आणि ९८८ कोटी १८ लाख खर्चाचे असे ५४ लाख रूपये शिलकीचे अंदाजपत्र सोमवारी सादर करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून न केलेली पाणीपट्टीतील करवाढ यंदाच्या वर्षापासून केली जाणार आहे. त्याचसोबत भांडवली मुल्यावर आधारित कर प्रणाली अवलंब करण्याचे संकेत पालिकेने दिले आहेत. विकासाची पंचसुत्री मांडतानाच स्मार्ट पायाभूत सुविधांसाठीही मोठी तरतूद करण्यात आली आहे. संगणकीकरणावर भर, करवाढीसाठी उत्पन्नाच्या नव्या साधनांचा विचार, पर्यावरणपूरकता आणि समानता या विषयांवर या अंदाजपत्रकात भर देण्यात आला आहे.



### ९८८ कोटी ७२ लाख रूपये महसुली ९८८ कोटी १८ लाख खर्चाचे असे ५४ लाख रूपये शिलकीचे अंदाजपत्र सोमवारी सादर

आर्थिक वर्ष २०२५-२६ चे अंदाजपत्रक आत उल्हासनगर महापालिकेने सादर केले. महानगर पालिकेचे दायित्व विचारात घेता २०२५-२६ या वर्षात उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याने तूर्त मालमत्ता करामध्ये वाढ न करता शासनाची मान्यता घेऊन भांडवली मूल्याधारित कर प्रणालीचा अवलंब करण्याचे संकेत पालिका प्रशासनाने अंदाजपत्रकाच्या माध्यमातून दिले आहेत. त्याचवेळी पाणीपट्टी मध्ये मात्र अल्प दरवाढ प्रस्तावित केली आहे.

मालमत्ता करासोबत आकारणी केले जाणारे पाणी देयक हे आता वेगळे करून स्वतंत्रपणे आकारले जाईल. तसेच १०० टक्के नळजोडणीसाठी जलमापक बसविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी यंदाचा अर्थसंकल्प स्मार्ट करण्यासाचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांसाठी मोठी तरतूद केली आहे. शहरातील रस्ते, चौक, शाळा, अभ्यासिका, आरोग्य केंद्र, शौचालय, स्मशानभूमी, उद्यान, नर्सरी, वाहनतळ, पशू वैद्यकीय दवाखाना आणि दिव्यांग भवन स्मार्ट रूपात केले जातील.

महानगरपालिकेच्या संगणकीकरणावर भर देण्यात आला असून नागरिकांच्या सूकर जीवनमानासाठी मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन, मालमत्तांचे नियमितीकरण व बीपीएमएसचा अवलंब, अभिलेखांचे संगणकीकरण, मालमत्ता नोंदवही, ऑडीओ लायब्ररी, जलस्त्रोतांचे लेखापरिक्षण, नागरिकांच्या तक्रारीसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर, वाहन ट्रेकिंग यंत्रणा, ऑनलाईन परवाने आणि क्यूआर कोड, रूग्णालयांचे संगणकीकरण अशा गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

उत्पन्न वाढीसाठी आयुक्त सरसावले

सुमारे ९०० कोटींची थकबाकी असलेल्या उल्हासनगर महापालिकेने उत्पन्न वाढीसाठी नवनवीन स्त्रोत शोधण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. मालमत्तांचे पुनर्मुल्यांकन, भांडवली मूल्याधारित करप्रणालीचा अवलं, पाणीपट्टीदरात वाढ, पाणीवापरानुसार पाणीपट्टी, मालमत्ता नियमितीकरण, केबल, इंटरनेट धारकांसाठी धोरण निश्चिती, व्यवसाय परवाना धोरण, जाहिरात दर, होर्डिंग्ज्स दर निश्चिती इ. मधून उत्पन्नवाढ करण्याचे संकेत दिले आहेत.

# भिवंडी महापालिकेचा सर्वसमावेशक अर्थसंकल्प सादर

## सामान्य नागरिकांना दिलासा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे सन 2024-25 चे सुधारीत रु. 1002,23.80 लक्ष व सन 2025-26 चे रक्कम रु. 1097,49.79 लक्ष रक्कमेचे रु. 9.69 लक्ष शिल्लक दर्शविणारे अर्थसंकल्प मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. रामप्रसाद सोळुंके यांनी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांना आज दि. 24/03/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता सादर केला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांना अर्थसंकल्प सादर केला. आयुक्त यांनी अर्थसंकल्पावर भाष्य केले की शहराच्या विकास कामांकरिता निधीची आवश्यता व महानगरपालिकेचे उत्पन्न याचा ताळमेळ घेऊन चांगल्याप्रकारे अर्थसंकल्प सादर केला आहे. यामध्ये मुख्य 5-6 विषयांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

आयुक्त अनमोल सागर यांनी या अर्थसंकल्पातील ठळक मुद्यांकडे प्रामुख्याने लक्ष वेधले. सर्वप्रथम 100 दिवसांच्या कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने यासाठी येणा-या वर्षाकरिता प्रशासकिय तरतुदीसह सीएसआर फंडातून काही निधी उभारण्याचे प्रयन्न आहेत.

- शहर सौंदर्याकरण व सुशोभिकरणासाठी आवश्यतप्रमाणे तरतूद करुन सर्वांच्या सहकार्याने सुशोभिकरणासाठी मोहिम राबविण्यात येणार असून त्याकरिता टास्क फोर्स तयार करण्यात आले आहे व त्यांच्या नियमितपणे बैठका घेण्यात येतील.3. शहर स्वच्छता हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे व त्यासाठी वेगळी तरतूद करण्यात आली असून ती वाढविण्याचा प्रयन्न या अर्थसंकल्पात केला आहे.
- भिवंडी महापालिकेमध्ये कर वसूलीसाठी विशेष लक्ष देण्यात आले नव्हते की जे महापालिकेचे उत्पन्नाचे महत्त्वाचे स्त्रोत आहे. संपूर्ण प्रशासनाकडून सहकार्य करुन जास्तीत जास्त वसूलीकरिता प्रयन्न करणार जेणेकरुन वसूलीमध्ये वाढ होईल.
- बीजीपी दवाखान्यामध्ये ओ.पी.डी. सुरु झाली असून त्याठिकाणी सुसज्ज रुग्णालय सुरु करायचे आहे. याचा मुख्य उद्देश नागरिकांना आरोग्याच्या सर्व सुविधा उपलब्ध होतील त्याचबरोबर घरी होणारे बाळंतपणाची संख्या कमी होणार आहे.
- पाणी पुरवठ्याबाबत असे आहे की शहरामध्ये पाणीपुरवठा समप्रमाणात व याग्यप्रकारे होण्यासाठी 100 द.ल.लि. योजना सुरु होणार आहे व ती यशस्वी झाल्यानतर भिवंडी शहराचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न निकाली निघेल. भुयारी गटार योजना व पाणी पुरवठ्याच्या इतर योजना व सुविधांसाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली आहे.
- शिक्षण विभागाकरिता डिजिटल क्लासरुम शासनाच्या सहकार्याने उभारणे कामीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये प्रगती करण्यासाठी तरतूद ठेवलेली आहे.8. सन 2025-26 च्या अर्थसंकल्पामध्ये मुख्य उद्देश हा आहे की, अर्थसंकल्पामध्ये जी तरतूद करण्यात आली आहे त्याचा पूर्णपणे आवश्यकतेनुसार योग्यप्रकारे वापर करणे.
- अर्थसंकल्पामध्ये पुनर्विनियोजन करण्याची आवश्यकता पडू नये. यासाठी सर्व विभागांनी कामाची आवश्यकता लक्षात घेऊन बिलांसाठी मार्च महिन्याची वाट न पहाता वेळापत्रकानुसार खर्च करुन वेळच्या वेळी कामाची देयके सादर करावीत. अर्थसंकल्प सादर करण्यापेक्षा त्याची तरतूदीनुसार व योग्यप्रकारे अंमलबजावणी करणे हे फार महत्त्वाचे आहे. कामाची आवश्यकता व निकड भासल्यास पुनर्विनियोजन करण्यास प्राधान्य देण्यात येईल. तरी सर्वांनी अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार व योग्यप्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करा9. कर्मचा-यांच्या सेवा विषयक बाबी परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने ई.एच.आर.एम.एस. आज्ञाप्रणाली विकसित करण्यात येईल.
- प्रशासनाच्या कामकाजाच्या दृष्टीकोनातून सुव्यवस्थापन व पारदर्शकता येण्याकरिता ई-ऑफिस आज्ञाप्रणाली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.11. शहरातील उद्याने व स्मशानभूमी यांचे पर्यावरण पूरक संवर्धन करणे कामीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे
- शहरातील पदपाथ यांचे सुव्यवस्थापन व सुशोभिकरण करण्यासह वाहतूक व्यवस्था सुनियत्रित करुन शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभिकरण करणे.सदर बैठकीस मा. अतिरीक्त आयुक्त (1) श्री. देविदास पवार, अतिरीक्त आयुक्त (2) श्री. विठ्ठल डाके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री. रामप्रसाद सोळुंके, उपायुक्त (मुख्यालय) श्री. रोहीदास दोरकुळकर, उपायुक्त (समाज कल्याण) श्रीमती प्रणाली घोंगे, उपायुक्त (शिक्षण) श्रीमती अनुराधा बाबर, उपायुक्त श्री. विक्रम दराडे, अंतर्गत लेखा परिक्षक श्री. नंदकुमार चौधरी आणि महानगरपालिकेचे सर्व सहायक आयुक्त व विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

# गीतासार



### अध्याय ५
### कर्मसंन्यासयोगः

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् । अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ ५-२६ ॥

काम-क्रोध मावळलेले, मन जिंकलेले, परब्रह्म परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतलेले जे ज्ञानी पुरुष असतात, त्यांच्या सर्व बाजूंनी शांत परब्रह्म परमात्माच परिपूर्ण भरलेला असतो. ॥ ५-२६ ॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः । प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥ ५-२७ ॥
यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः । विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ ५-२८ ॥

बाहेरच्या विषयभोगांचे चिंतन न करता ते बाहेरच ठेवून, दृष्टी भुवयांच्या मध्यभागी स्थिर करून तसेच नाकातून वाहणारे प्राण व अपान वायू सम करून, ज्याने इंद्रिये, मन व बुद्धी जिंकली आहेत, असा मोक्षतत्पर मुनी इच्छा, भय आणि क्रोध यांनी रहित झाला की, तो सदोदित मुक्तच असतो. ॥ ५-२७, ५-२८ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् । सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति ॥ ५-२९ ॥

माझा भक्त मला सर्व यज्ञ आणि तपांचा भोक्ता, सर्व लोकांच्या ईश्वरांचाही ईश्वर, सजीवमात्रांचा सुहृद अर्थात स्वार्थरहित, दयाळू आणि प्रेमी, असे तत्त्वतः समजून शांतीला प्राप्त होतो. ॥ ५-२९ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगो नाम पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील कर्मसंन्यासयोगः नावाचा हा पाचवा अध्याय समाप्त झाला. ॥ ५ ॥

## आरोग्य
# हाडे मजबूत ठेवण्यासाठी



1. कमी कॅलरी आहार टाळा- लठ्ठपणा वाढण्याच्या भीतीने आरोग्याबाबत जागरूक लोक अनेकदा कमी कॅलरीजचा आहार घेतात, परंतु हाडांच्या आरोग्यासाठी ते योग्य नाही कारण शरीराला कॅलरीज मिळाल्या नाहीत तर हाडे कमकुवत होऊ लागतात. कमी कॅलरीजमुळे, चयापचय गती देखील खूप कमी होऊ लागते, ज्यामुळे स्नायूंचे वस्तुमान कमी होऊ लागते. यामुळे हाड कमकुवत होतात. अभ्यासात असे आढळून आले आहे की जर रोज एक हजारपेक्षा कमी कॅलरी घेतल्यास हाडे कमकुवत होते.
2. व्हिटॅमिन डी आवश्यक - व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन के हाडांच्या मजबूतीसाठी सर्वात महत्वाची असतात. व्हिटॅमिन डीमुळे शरीरात कॅल्शियमचे शोषण शक्य होते. प्रति मिलिलिटर रक्तामध्ये 30 नॅनोग्राम व्हिटॅमिन डी असणे आवश्यक आहे. याच्या कमतरतेमुळे हाडांमध्ये ऑस्टियोपेनिया, ऑस्टियोपोरोसिस इत्यादी रोग होऊ शकतात.
3. पुरेसे प्रथिने घेणे देखील महत्त्वाचे आहे - हाडांच्या आरोग्यासाठी पुरेसे प्रथिने असणे आवश्यक आहे कारण शरीरात प्रथिने कमी असल्यास कॅल्शियम योग्यरित्या शोषले जाऊ शकत नाही.

# कोकणात शंभर टक्के डिजिटल शाळांचा निर्धार






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोकण पदवीधर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी कोकणातील शंभर टक्के शाळा डिजिटल करण्याचा निर्धार केला आहे. ह्या उपक्रमाअंतर्गत, रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी त्यांच्या स्थानिक विकास निधीमधून डिजिटल साहित्याचे वाटप करण्यात आले. ठाणे शहर भाजप कार्यालय, रेमंड शोरूम जवळ, वर्तक नगर ठाणे पश्चिम या ठिकाणी आमदार निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ठाणे शहर विधानसभेचे आमदार मा. श्री. संजयजी केळकर, भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष मा. श्री. संजयजी वाघुले, माजी नगरसेवक मिलिंदजी पाटणकर, मनोहरजी डुंबरे, सुभाष पाटणकर, संचालक मा. श्री. बाबासाहेब दगडे, प्राध्यापक संभाजी शेळके, मा. श्री. सचिन मोरे आदि मान्यवर व शिक्षक उपस्थित होते. कोकणातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या दृष्टीने हा उपक्रम निश्चितच महत्त्वाचा ठरेल असा विश्वास आहे.

# वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा



उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेणा कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्र रूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. दोन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती. जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता. मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निदर्गसंपदा जळून खाक झाली होती. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे. नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. ( आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो. ) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# पॅरा कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाला विजेतपद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गाजियाबाद दिल्ली येथे झालेल्या दुसऱ्या राष्ट्रीय पॅरा कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने अंतिम विजेतेपद प्राप्त केले.
या स्पर्धेत 16 राज्यांनी सहभाग घेतला होता भारतातील बलाढ्य राज्याच्या संघांना पराभूत करून महाराष्ट्राच्या क्रीडा विश्व न्यास या संघाने राजस्थान संघाला 40/19 अशा 21 गुणांनी पराभूत करून राष्ट्रीय पॅरा कब्बडी त अंतिम विजेतेपद प्राप्त केले.
या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट चढाईपटू म्हणून राज राठोड व सर्वोत्कृष्ट पकडपटू म्हणून मंगेश जाधव यांना गौरविण्यात आले. कर्णधार सहदेव बर्डे, उप कर्णधार सचिन तांडेल, राज राठोड, अमन मणियार, मंगेश जाधव, ओमकार महाडिक, हितेश पाटील, राज राणे, महेश वसावे, महेंद्र जगताप, निलेश बाथे, रामेश्वर कुर्वेले ह्या सर्व खेळाडूंनी मोलाची कामगीरी पार पाडली.
तसेच संघाचे सहाय्यक प्रशिक्षक मदन झा फिटनेस ट्रेनर दिशांत पाटिल व संघ व्यवस्थापक दिनेश कटोडिया ह्या सर्वांचा विजयामागे मोलाचे सहकार्य लाभले.
या स्पर्धेला प्रमुख प्रशिक्षक म्हणून दिव्यांग प्रशिक्षक रवींद्र सकपाळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच दिव्यांग क्रीडा विश्वनाथ संस्थेचे अध्यक्ष पंकज चौधरी व मार्गदर्शक संदीप पाटील व बटू निकम, अनिता मोजाड यांचे अमूल्य मार्गदर्शन या दिव्यांग कबड्डीपटूंना लाभले.
दिव्यांग कबड्डीला प्रोत्साहित करण्याकरता बेंगॉल वॉरिअर संघासोबत कॅप्री स्पोर्ट्स आणि कॅप्री ग्लोबल होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड ह्या मोठ्या कंपन्यांकडून दिव्यांग खेळाडूंना प्रात्याक्षीता सह प्रक्षिशक शिबिराचे आयोजन करून खेळाकरीता आवश्यक असे साहित्य वाटप करून दिव्यांग खेळाडूचे आत्मविश्वास व मनोबल वाढवला. त्यामुळे त्यांचा खेळ बहरून आला आणि त्यामुळे हा कार्यक्रम या संघाला उपयुक्त ठरला.

# प्राथमिक शिक्षक संघातर्फे कर्तृत्ववान नारी शक्तीचा सन्मान






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे तालुका अधिवेशन बांठिया हायस्कूल नवीन पनवेल येथे संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी पनवेलचे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर भूपेंद्र पाटील (माजी पंचायत समिती सदस्य) संदीप पाटील (माजी नगराध्यक्ष) नितीन पाटील( माजी नगरसेवक) शशिकांत शेळके (माजी सरपंच) प्रशांत फुलपगार शेडगे साहेब (उपशिक्षणाधिकारी) मोहिते साहेब (गटशिक्षणाधिकारी पनवेल) साबळे साहेब( पोषण आहार अधीक्षक) कामडी मॅडम मॅनेजर बँक ऑफ महाराष्ट्र, सौ.सुनंदा भगत यशस्वी उद्योजिका , अभिजीत मटकर सूर्यकांत करंजीकर माजी चेअरमन पेण पतपेढी, जयदास घरत जिल्हाउपाध्यक्ष विकास पाटील जिल्हासचिव प्रकाश काथारा जिल्हाखजिनदार मंदार रसाळ जिल्हाध्यक्ष जुनी पेन्शन संघटना, .उमेश विचारे खालापूर जिल्हा कार्यकररिणी, अंकुश महाडिक तालुका अध्यक्ष माणगाव, महेंद्र गावंड तालुकाअध्यक्ष उरण, दीपक पालकर तालुकाध्यक्ष खालापूर, अजय केंद्रे तालुकाध्यक्ष कर्जत ,सौ.राजश्री मोकल तालुकाध्यक्ष जुनी पेन्शन संघटना पनवेल, कय्युम दाखवे अध्यक्ष उर्दू संघटना आणि टीम ,केंद्रप्रमुख सचिन पाटील, धनंजय ठाकूर, सौ. अंकिता हुद्दार ,सौ सरिता ठाकूर, श्री ठाकूर, श्री भोईर, काशिनाथ जाधव, अ.शि . म्हात्रे सर्व आदरणीय केंद्रप्रमुख पनवेल ,सर्व जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी,सर्व तालुका कार्यकारणी ,सदस्य आणि पनवेल तालुक्यातील 550 शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते
प्रास्ताविकात बोलताना पनवेल तालुका अध्यक्ष प्रभाकर घरत यांनी आपल्या संघटनेने शिक्षक हिताची केलेली कामे सांगितली व अनेक शिक्षकांच्या समस्या मांडल्या. तसेच रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. सुभाष भोपी यांनी अनेक शिक्षकांच्या मागण्या मांडल्या आणि शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदारांना विनंती केली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतात महापालिका शाळा व हस्तांतरण, शिक्षक समायोजन,आणि इतर जास्तीत जास्त समस्या दूर करण्याचा प्रयत्न निश्चितच केला जाईल अशी ग्वाही दिली. त्यानंतर सर्व पुरस्कार प्राप्त नारीशक्तीं चा सन्मान आमदारांच्या शुभहस्ते करण्यात आला.
अधिवेशन यशस्वी करण्यासाठी सुभाष भोपी , जयदास घरत , प्रकाश काथारा, प्रभाकर घरत, दीपक घरत, गंगाधर पाटील, राजेंद्र मोकल, प्रशांत पाटील, नवनीत गावंड, संजय सावळे, संदीप जुईकर, जितेंद्र महाले, तुळशीराम वारदे, संजय पाटील, केसरीनाथ दरे, सुरेश काळे, अरुण म्हात्रे, राजेंद्र शिंदे,गोपीनाथ थळी, राजेंद्र वाघमारे नितीन कुडावकर, संदीप पाटील, नितीन गायकवाड , विजय शहाबाजकर, दिपक पगडे, गणेश गायकवाड, भागवत पवार सूर्यकांत शेवाळे , राम घोलप, रवींद्र तांडेल ,इत्यादींनी प्रयत्न केले .सौ .स्वाती गायकवाड सौ. धनश्री पाटील सौ. रुक्मिणी इथापे, सौ निर्मला चौधरी यांनी सुंदर अशी रांगोळी काढून कार्यक्रमाची शोभा द्विगुणीत केली तसेच स्मितकाव्य मंच यांनी आपल्या सुमधुर गीतांनी सर्वांना मंत्रमुग्ध केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.श्री प्रशांत पाटील आणि सौ कविता नवनीत गावंड यांनी केले आलेल्या सर्व मान्यवरांचे, उपस्थितांचे आभार राजेंद्र मोकल यांनी मानले .

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ११ हजार १९७ प्रकरणे निकाली

## १६ कोटी ६० लाख १४ हजार ९६६ रुपये वसूल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने दि. २२ मार्च रोजी रायगड जिल्ह्यात आयोजित केलेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण ११ हजार १९७ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ५२ हजार ८६० वादपूर्व प्रकरणे व १०हजार १५५ प्रलंबित अशी एकूण ६३ हजार १५ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८ हजार १७६ वादपूर्व प्रकरणे व ३ हजार २२ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ११ हजार १९७ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण १६ कोटी ६० लाख १४ हजार ९६६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे. ४ जोडप्यांचा लोक अदालत मध्ये संसार जुळला जिल्ह्यातील लोकन्यायालयात ४ जोडप्यांचा (रोहा-१, महाड-१ अलिबाग-२) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधिश श्री. ए. एस. राजदेकर यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. जिल्ह्यामध्ये एकूण ३५ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना २ कोटी ७० लाख इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.
रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २८ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली. या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ए. एस. राजंदेकर व न्यायाधीश तथा सचिव श्री. अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

## श्री भीमेश्वर सद्गुरु नित्यानंद संस्था
# गणेशपुरी विश्वस्तपदी 'जगन्नाथ पाटील' यांची नियुक्ती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : स्वामी नित्यानंद समाधी मंदिर गणेशपुरी ता.भिवंडी,जि. ठाणे येथील " श्री भीमेश्वर सद्गुरु नित्यानंद" संस्थेच्या विश्वस्त पदाची नियुक्ती नुकतीच भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आली.त्यापैकीच गणेशपुरी येथील स्थानिक,प्रतिष्ठित सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते जगन्नाथ पोसु पाटील यांची विश्वस्तपदी नियुक्ती करण्यात आल्यामुळेच त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.
" श्री भीमेश्वर सद्गुरू नित्यानंद संस्थेत" माजी विश्वस्त यांच्याकडून आर्थिक गैरव्यवहार व गैरव्यवस्थापन याबाबत न्यायालयात खटले चालू होते,त्याबाबत न्यायालयाकडून संबंधित खटल्यांचा न्यायनिवाडा देण्यास विलंब झाला.अखेर या बाबतीतचा विश्वस्त निवडीचा निर्णय भिवंडी जिल्हा न्यायाधीश एन्.के.कारंडे यांच्या 19 मार्चच्या आदेशानुसार एकूण इच्छुक उमेदवारांपैकी गुणवत्तेच्या निकषावर 11 उमेदवारांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करून,गेल्या 2016 पासूनच्या रखडलेल्या नियुक्त्या करून, सदर सार्वजनिक संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचा मार्ग मोकळा केला आहे. न्यायालयांनी या नियुक्त केलेल्या व्यक्ति 1) सुनिल ज्ञानोबा पोटे 2)जगन्नाथ पोसु पाटील 3)अनुजा अमोल सिंगलवार 4) नयनसिंग जटनसिंग ठाकोर 5)उदय ईश्वरलाल व्यास 6)रविंद्र चंदुलाल शुक्ला 7)विठ्ठल मोहन राजपूत 8) ललिता नितीन जोशी9)अमित किसन राऊत 10)आनंद प्रभाकर अन्वेकर 11) सुगंधा सचिन जाधव आदि विश्वस्तांनी यापुढील संस्थेचे कामकाज पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीत करून भाविकांना उत्तम सोईसुविधा पुरवाव्यात अशी गणेशपुरी परिसरातील नागरिकांकडून मागणी करण्यात येत आहे.

## वाहतूक अधिसूचना रायगड जिल्ह्यात
# २५ मार्चला वाहतूक नियमन लागू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड :गेल कंपनी, उसर (ता. अलिबाग) येथे मोठ्या मशिनरीच्या वाहतुकीसाठी 25 मार्च रोजी सकाळी 2 ते 8 या वेळेत वाहतूक नियमन लागू करण्यात आले आहे.
Premier Transport Limited या कंपनीमार्फत हे सेल (CARGO) वाहतूक होणार असून त्याला वाहतुकीची अधिकृत परवानगी देण्यात आली आहे. हा जड माल वाहून नेण्यासाठी पुणे-चाकण-आलेफाटा-संगमनेर-सिन्नर-नाशिक-इगतपुरी-कसाराघाट-कल्याण-तळोजा-पेण-नागोठणे-पेझारी-अलिबाग-कुरूळ मार्ग निश्चित करण्यात आला आहे.
वाहतुकीच्या वेळी कोंडी होऊ नये म्हणून प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली असून, जिल्हा वाहतूक शाखेच्या सहकार्याने योग्य तो बंदोबस्त ठेवला जाणार आहे.
25 मार्च रोजी पहाटे 2 ते सकाळी 8 या वेळेत पेण-नागोठणे-कुडूस- पेझारी-अलिबाग-कुरूळ मार्गावर वाहतूक एकाच लेनवरून चालणार आहे. नागरिकांनी आणि वाहनचालकांनी याबाबत सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# बापाची साथ शेवटपर्यंत सोडू नका- अनिल बोरनारे



## कल्याणमध्ये रंगले बापावरील राज्यस्तरीय कवी संमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बाप जीवंत असेपर्यंत परिस्थितीचे काटे आपल्या पायापर्यंत पोहचत नाही बापाला तुमच्या संपतीचा वाटा नको असतो हवं असते प्रेम म्हणून या बापाची शेवटपर्यंत साथ सोडू नका असे आवाहन मुंबई मराठी अध्यापक संघांचे अध्यक्ष व भाजप प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य अनिल बोरनारे यांनी केले

कल्याणमधील वैष्णवी लान्स च्या सभागृहात जिजाई सेवा बहुउद्देशीय संस्था व कवी व्याख्याते संदीप ईश्वर पाटील व कल्पना संदीप पाटील यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कवी संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून अनिल बोरनारे बोलत होते यावेळी प्रसिद्ध कीर्तनकार हभप सत्यवान पाटील राजेंद्र पाटील शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे आदी उपस्थित होते

या कविसंमेलनाला राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या कवी कवियित्रींनी बापावरील कर्तृत्वाच्या कविता सादर केल्या सर्व कविंना सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. बापाच्या कर्तृत्वाचं मोजमाप कोणत्याही कविता कादंबरीतून करता येणार नाही एव्हढं मोठं कर्तृत्व बापाचं असतं. आपल्या मुलांसाठी कुटुंबासाठी तो एक दिपस्तंभ असतो. मुलांच्या हट्टाला तो कधीही नकार देत असल्याने अनेक मुलांना त्याची किंमत नसते असे परखड मत अनिल बोरनारे यांनी व्यक्त करून राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातील तरुणांसाठी बापा च्या कर्तृत्वावर राज्यस्तरीय कविता लेखन करण्याची सूचना अनिल बोरनारे यांनी आयोजकांना केली.



स्व.अण्णासाहेब पाटील यांच्या 43 पुण्यतिथी निमित्ताने दि.23 मार्च 2025 रोजी माथाडी भवन, वाशी, नवी मुंबई येथे कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील, विधानपरिषद सदस्य शशिकांत शिंदे, माजी खासदार संजीव नाईक, व्यवस्थापकीय संचालक श्रीधर ठुबे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संध्या साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला महिला कार्यकर्त्यांकडून मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्या महिलेने भर रस्त्यात मारहाण केल्याची घटना कल्याण पश्चिमेतील अहिल्याबाई चौक परिसरात घडली. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला आहे. मोहन उगले असे या माजी नगरसेवकाचे नाव असून मारहाण करणाऱ्या महिलेचे नाव राणी कपोते असे आहे. रविवारी सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी कामाचे श्रेय घेण्यावरून या दोघांमध्ये वाद झाला होता.

रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमावरून या दोघांमध्ये वाद झाला होता. मोहन उगले यांच्यावर आरोप आहे की, त्यांचा महिलेसोबत वाद झाला आणि त्यांनी त्या महिलेला लज्जास्पदपणे हात लावला. यावरून तणाव निर्माण झाल्यामुळे शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्या राणी कपोते यांनी माजी नगरसेवक मोहन उगले यांना सार्वजनिक ठिकाणी धक्काबुक्की करत मारहाण केली. हा प्रकार मोबाईलमध्ये रेकॉर्ड झाला असून, त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेबाबत प्रसिद्धी माध्यमांना माजी नगरसेवक मोहन उगले यांनी प्रतिक्रिया दिली की, काल रस्त्याचे भूमिपूजन होते. महापालिकेच्या कामाच्या भूमिपूजन कार्यक्रयामध्ये पुरूषांच्या अंगावर जाणे, पुरूषांना धक्का बुक्की करणे हा प्रकार झाल्याने आम्ही बाजार पेठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. या महिलेचा शिवसेनेशी काडीमात्र संबंध नाही. ती आमच्या पक्षाची पदाधिकारी नाही. कुठपर्यंत पुरुष सहन करु शकतो, त्याला पण लिमिट असते कायद्याने महिलांना संरक्षण आहे. महिलेने पुरूषावर हात टाकला ही गंभीर बाब असून पक्षाकडे आमदार, जिल्हा प्रमुख यांच्या कडे, मागणी असेल ज्यांचा पक्षाशी संबंध दाखवितात त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे असे मोहन उगले यांनी सांगितले.

# पाण्यासाठी पन्नास इमारतील रहिवाशांची एमआयडीसी कार्यालयावर धडक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** वेळेवर पाणी बिल भरूनही गेली 12 दिवस पाणी टँचाईने हैराण झालेल्या 50 इमारतीतील काही नागरिकांनी काल सोमवारी डोंबिवलीतील एमआयडीसी कार्यालयावर धडक दिली. मात्र पुन्हा आश्वासन मिळाल्याने लवकरात लवकरात आमची पाणी समस्या सोडविली नाही तर आम्ही राजकीय आधार न घेता कार्यालयासमोर आंदोलन करू असा इशारा दिला.

पूर्वेकडील लोढा हेरिटेज देसले पाडा येथे या 50, इमारती आहेत. या इमारतीना एमआयडीसीकडून पाणी पुरवठा केला जातो. गेल्या12 दिवसांपासून या इमारतींचा पाणी पुरवठा कमी दाबाने तर कधी पाणीच येत नसल्याने येथील राहिवाशी हैराण झाले आहेत. अखेर संतापलेले रहिवाशांनी सोमवारी डोंबिवलीतील एमआयडीसी कार्यालयात उपअभियंता आनंद गोगटे यांची भेट घेतली. मात्र कार्यकारी अभियंता आव्हाड यांच्याशी चर्चा करून माहिती देतो असे आश्वासन राहिवाशांना देण्यात आले.

याबाबत राहिवाशी म्हणाले, एमआयडीसी पाणी देईना आणि पाण्याचा टँकर परवडेना अशी आमची अवस्था झाली आहे. एका टँकर करता दोन हजार मोजावे लागत असल्याने पाणी बिल का भरायचे असा प्रश्न राहिवाशांनी यावेळी उपस्थित केला.



# दोन दिवसात रेल्वे हद्दीतील पार्किंग सुरु करा अन्यथा आंदोलन !

## ठाकरेंच्या शिवसेनेचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** तीन महिन्यांपासून बंद असलेले डोंबिवली पश्चिमेकडील पे अँड पार्क बंद आहे. नागरिकांना आपली वाहने पार्क करण्याकरता अडचण येत असल्याने त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेकडे नागरिकांनी तक्रारी केल्या. या तक्रारीवर लक्ष देत सोमवारी पदाधिकारी व शिवसैनिकांनी डोंबिवली रेल्वे प्रबंधक यांना निवेदन दिले.दोन दिवसात रेल्वे हद्दीतील पार्किंग सुरु करा अन्यथा आंदोलन असा इशारा यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला.डोंबिवली शहराची लोकसंख्या वाढली तशी वाहनांचीही संख्या वाढली. मात्र शहरातील वाहन पार्किंग समस्या जाणवत असल्याने स्थानिक पातळीवर प्रशासनाने व रेल्वे प्रशासंनाने यावर पे अँड पार्क अशी सुविधा उपलब्ध करून दिली.

डोंबिवली पश्चिमेला स्टेशन बाहेर रेल्वे प्रशासनाने पे अँड पार्क सुरु केले होते. मात्र नियम मोडून वाहनचालकांकडून पार्किंगचे जादा पैसे घेतले जात होते. मनसेच्या आंदोलनानंतर ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी आपली चूक मान्य करून काही वाहनचालकांना जास्तीचे पैसे परत केले. यावेळी रेल्वे सुरक्षा बल जवानांनी ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांना सरकारी दरपत्रक लावावे असे सांगितले होते. त्यानंतर येथील पे अँड पार्क बंद झाले.

4 जानेवारी रोजी मनसेच्या आंदोलनानंतर नागरिकांना न्याय मिळाला पण पार्किंग सुविधा बंद झाली. आधीच डोंबिवली शहरात वाहतुकीचे बारा वाजले असताना त्यात वाहनांच्या पार्किंगची मोठी समस्या जाणवत आहे. आता पे अँड पार्क सुविधा बंद आणि नो पार्किंग मध्ये वाहने उभी केल्यास दंड भरावा लागतो अशी अवस्था वाहनचालकांची झाली होती. यावर नागरिकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे आपली समस्या मांडली. समस्या ऐकून कल्याण जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी डोंबिवलीत शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे, विभागप्रमुख शाम चौगले, राजेंद्र सावंत, प्रकाश कदम, मंदार निकम, ऋतूनिल पावस्कर, शेखर चव्हाण, प्रिया दांडगे, सायली जगताप सर्व शिवसैनिक पदाधिकाऱ्यांनी डोंबिवली रेल्वे प्रबंधकाची भेट घेऊन दोन दिवसात रेल्वे हद्दीतील पार्किंग सुरु करा अन्यथा आंदोलन करू असा इशारा दिला.

# भिवंडी महापालिकेत शहीद दिन साजरा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** दिनांक २३ थोर क्रांतीकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या बलीदानाच्या स्मृतीप्रित्यर्थ महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर श्री. वाळकृष्ण क्षिरसागर उपायुक्त (कर), श्री. संदिप पटणावर कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा, श्री. नंदकुमार चौधरी अंतर्गत लेखा परिक्षक यांचे हस्ते थोर क्रांतीकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी श्री. मिलींद पळसुले सहा. आयुक्त (समाजकल्याण), श्री. शेखर चौधरी नियंत्रण अधिकारी (वाहन विभाग), श्री. हरेष भंडारी आरोग्य विभाग प्रमुख, श्री. ज्ञानदेव वाघमारे उप-अभियंता (विद्युत), श्री. नितेश चौधरी समाजकल्याण विभाग प्रमुख, श्री. अरविंद घुगरे प्र. शहर विकास विभाग प्रमुख आणि महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थीत होते.

# आदिवासी विकास विभाग अप्पर आयुक्तांची आत्मा मालिक शैक्षणिक क्रीडा संकुलास भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद (प्रतिनिधी )-** येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट (कोकमठाण) संचलित मोहिली - अघई आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलास आदिवासी विकास विभागाचे अप्पर आयुक्त गोपीचंद कदम यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आत्मा मालिक माउलींच्या कृपाशीर्वादाने, संत परिवाराच्या प्रेरणेने, संस्थेचे अध्यक्ष, समस्त विश्वस्त मंडळ, स्थानिक व्यवस्थापन समिती व संस्थेचे कार्याध्यक्ष उमेशजी जाधव यांच्या मार्गदर्शनाने संकुल सुरु आहे. सदर या शैक्षणिक संकुलात संस्थेच्या माध्यमातून संकुलात सीबीएससी स्कूल, इंग्लिश मीडियम स्कूल तसेच अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू आहे.



सदर, अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग ठाणे, गोपीचंद कदम यांनी येथे सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, अप्पर आयुक्त गोपीचंद कदम यांनी प्राचीन गुरुकुल परंपरा व आधुनिक शिक्षण पद्धती यांचे महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच जोपर्यंत या संस्थेत आदिवासी विद्यार्थ्यांचा दर्जात्मक विकास होत राहील, तोपर्यंत योग्य मार्गदर्शनाबरोबरच आदिवासी विकास प्रकल्प विभागाकडून सहकार्याची भूमिका राहणार असल्याचे कदम यांनी म्हटले. तर आत्मा मालिक ध्यानपीठाचे कार्याध्यक्ष उमेशजी जाधव यांनी अप्पर आयुक्तांच्या संकल्पनेतील विद्यार्थी घडवण्याचे वचन यावेळी दिले. यावेळी आत्मा मालिक ध्यानपीठाचे कार्याध्यक्ष उमेश जाधव, अतिरिक्त प्रांतअधिकारी ज्योती कांबळे, शहापूर प्रकल्प अधिकारी आर.बी. हिवाळे, सहा.प्रकल्प अधिकारी जगदीश पाटील, बापूराव जाधव, संस्थेचे व्यवस्थापक सामान्य प्रशासन उल्हास पाटील, संस्थेचे एच.आर.विभाग व्यवस्थापक राहुल जाधव, दत्तात्रय तेलोरे, सय्यद वल्ली, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल प्राचार्य कैलास थोरात, इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्यूनियर कॉलेज प्राचार्य पंकज बडगुजर, ज्यूनियर कॉलेजच्या विभाग प्रमुख सोनी पाशा, प्रा. गोविंद चव्हाण , प्रा. सूर्यकांत नवले आदींसह संकुलातील विद्यार्थी, शिक्षक- शिक्षकेतर व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# महाराष्ट्रात 'हलाल प्रमाणपत्रां'वर बंदीची मागणी

## उपमुख्यमंत्र्यांकडून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** - बेकायदेशीरपणे 'हलाल प्रमाणपत्रांवर' उत्तर प्रदेश राज्यात ज्याप्रमाणे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बंदी घातली आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणण्याबाबत केलेल्या मागणीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा सचिव यांना प्रस्ताव सादर करण्याचे नुकतेच आदेश दिले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने नुकतीच उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांची भेट घेऊन हलाल उत्पादनांवर बंदीची मागणी करण्यात आली होती.

या वेळी समितीचे मुंबई येथील श्री. सतीश सोनार, श्री. रवी नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार श्री. आनंद तिडके (बोंडारकर) हे उपस्थित होते. 'सेक्युलर' व्यवस्था असतांना धार्मिक आधारावर उत्पादनांचे प्रमाणिकरण हे घटनाबाह्य असून जर महाराष्ट्रात हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी घातली गेली, तर आम्ही या निर्णयाचे स्वागतच करू, असेही समितीने म्हटले आहे. खाद्यपदार्थांच्या संदर्भात कायद्यानुसार 'भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक



प्राधिकरण' (FSSAI) या शासकीय संस्थेला खाद्यपदार्थांचे मानके ठरवण्याचा व प्रमाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात आला आहे; मात्र 'हलाल प्रमाणन' ही एक समांतर प्रणाली उभी करण्यात आली आहे, जी खाद्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत भ्रम निर्माण करून सरकारी नियमांचे उल्लंघन करते.

महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून कोट्यवधी रुपये गोळा करण्यात येत आहेत. त्यामुळे उत्तर प्रदेशात त्यावर बंदी आणण्यात आली. स्वत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे स्पष्ट केले आहे. तसेच हा पैसा लष्कर-ए-तोयबा, इंडियन मुजाहिदीन, इस्लामिक स्टेट आदी आतंकवादी संघटनांच्या सुमारे ७०० आरोपींना कायदेशीर साहाय्य करण्यासाठी वापरला जातो, हे अतिशय धक्कादायक आहे. म्हणूनच या संदर्भात निवेदनासह काही कागदपत्रेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांना सादर करण्यात आली होती.

या संदर्भात महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे हलाल प्रमाणपत्रे देणाऱ्या खाजगी संस्थांवर तत्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी; हिंदूंच्या संविधानिक अधिकारांवर आघात करणाऱ्या हलाल प्रमाणिकरणावर त्वरित बंदी आणावी; हलालच्या नावाखाली खाजगी संस्थांनी जमा केलेल्या निधीची चौकशी करून कारवाई करावी; हलाल प्रमाणपत्रांतून जमा केलेली अवैध संपत्ती व्याजासह वसूल करावी; या पैशाचा उपयोग कुठे केला आणि त्यातून राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाला का, याबाबतही सखोल चौकशी करावी, अशा मागण्या निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आल्या. त्यावर उपमुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या डोंबिवलीतील शाळेचा नामकरण सोहळा



## कै. अ. कृ. दीक्षितांच्या स्मृतींना उजाळा

**विविध उपक्रमांचे उद्घाटन झाले : फोटो गॅलरीचे उद्घाटन – श्रीराम शिधये(माजी विद्यार्थी व सहसंपादक महाराष्ट्र टाइम्स)**

**ग्रंथालयाचे उद्घाटन – नितीन दळवी (उद्योजक व माजी विद्यार्थी) यांच्या हस्ते झाले.**

**खेळणी घराचे उद्घाटन- पालक प्रतिनिधी सौ.प्राजक्ता लोध यांच्या हस्ते झाले.**

**१९७१ च्या माजी विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व करत आनंद घैसास यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचे टेलिस्कोप शाळेला भेट दिला.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** ८८ वर्षांचा गौरवशाली वारसा लाभलेल्या जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट (G.E.I.), डोंबिवली शाखेच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेच्या नामकरण सोहळ्याचे आयोजन रविवार, दि. २३ मार्च २०२५ रोजी स. वा. जोशी संकुल, डोंबिवली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या शाळेला संस्थेचे माजी कार्यवाह व कोषाध्यक्ष कै. अ. कृ. दीक्षित यांचे नाव देण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या नामफलकाचे उद्घाटन आणि संस्थेचे आद्य संस्थापक कै. गो. ना. अक्षीकर तसेच कै. अ. कृ. दीक्षित यांच्या प्रतिमेच्या अनावरणाने झाली. हे उद्घाटन मा. डॉ. संजय देशमुख (माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ) व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त या. डॉ.इंदुराणी जाखड यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. उल्हास कोल्हटकर, कल्याण-डोंबिवली महानगरपिकेच्या सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर, विशेष अतिथी आंतरराष्ट्रीय बास्केटबॉलपटू मनीषा कापरेकर डांगे, संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ सदस्य, पूर्व प्राथमिक विभागाचे अध्यक्ष राधाकृष्ण पाठक , शाळेच्या मुख्याध्यापिका समता पावसकर, दीक्षित कुटुंबीय व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

दीक्षित कुटुंबीयांचा सन्मान कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी कै. अ. कृ. दीक्षित यांचे सुपुत्र अभय दीक्षित आणि श्रीमती परांजपे यांनी या प्रसंगी भावनाविवश होत काही आठवणींना उजाळा दिला आणि संस्थेने दिलेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दीक्षित सरांच्या शेवटच्या काळात मोहन शिंदे, राजाराम गोरीवले व संतोष दळवी या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मदत केली त्यामुळे त्यांचाही सत्कार शाळेतर्फे करण्यात आला.

कुलगुरूंनी आपल्या मनोगतात शाळेच्या उपक्रमशीलतेचे व संस्थेच्या कार्याचा गौरव करत कौतुक केले. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरण (NEP), शिक्षण पद्धती, आणि मातृभाषेतून शिक्षण या महत्त्वाच्या मुद्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले. या ऐतिहासिक क्षणाने जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या कार्यास नवसंजीवनी मिळाली असून, कै. अ. कृ. दीक्षित यांचे कार्य व स्मृती विद्यार्थ्यांच्या मनात सदैव प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यानी व्यक्त केला.

# राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन

**- जयकुमार गोरे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी 50 टक्के सहाय्यक अनुदान शासनाकडून तर उर्वरित 50 टक्के खर्च ग्रामपंचायतीने करावयाचा आहे. त्या अनुषंगाने कमी उत्पन्न व कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीला त्यांच्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन देणे सुलभ व्हावे म्हणून ग्रामपंचायतींना लोकसंख्या व उत्पन्नानुसार वाढीव साहाय्यक अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सन 2022 पासून सुधारित किमान वेतन लागू करण्यात आले असून त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनासाठी साहाय्यक अनुदान शासनाकडून देण्यात येते. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन दिले जात असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले. याबाबत सदस्य हेमंत ओगले यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. मंत्री गोरे म्हणाले, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आले असून, दर पाच वर्षांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून हे वेतन सुधारण्यात येते. कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी 50 टक्के सहाय्यक अनुदान शासनाकडून देण्यात येते, तर उर्वरित 50 टक्के खर्च ग्रामपंचायतीने करावयाचा आहे. काही ग्रामपंचायतींसाठी हा खर्च करणे कठीण होत असल्याने, लोकसंख्या व उत्पन्नाच्या आधारावर वाढीव साहाय्यक अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी गतवर्षीच्या सर्व करांच्या 90% वसुली करणे बंधनकारक ठेवण्यात आले आहे. मात्र, 90 टक्के वसुली न झाल्यास, वसुलीच्या प्रमाणानुसार राज्य शासनाचे अनुदान निश्चित केले जाते. वसुलीची अट रद्द करून 100 टक्के किमान वेतन शासनातर्फे देण्याची मागणी केली जात आहे. तथापि, ही अट रद्द केल्यास शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडेल. तसेच, वसुलीतील घट झाल्यास ग्रामपंचायतींच्या उत्पन्नावर परिणाम होऊन विकासकामांवर विपरित प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

## संक्षिप्त

### चुकीच्या औषधाने विद्यार्थिनीचा मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : कुष्ठरोग झालेला नसतानादेखील आश्रमशाळेतील विद्यार्थिनी खुशबू ठाकरे हिला कुष्ठरोगी ठरवल्याने तिच्यावर चुकीच्या पद्धतीने उपचार करण्यात आले. याप्रकरणी वरवणे येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील मुख्याध्यापक अजित पवार व अधीक्षिका सुवर्णा वरगने यांना निलंबित करण्यात आले आहे. दोन महिन्यानंतर आदिवासी विकास विभागाने ही कारवाई केली असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाणार आहे.

पेण तालुक्याच्या वरवणे गावातील शासकीय आश्रमशाळेमध्ये चौथीत शिकणाऱ्या खुशबू ठाकरे या विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर जन्मापासून तीन चट्टे होते. गेल्या वर्षी १६ डिसेंबर रोजी आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य शिबीर घेण्यात आले होते. त्यावेळी डॉक्टरांनी खुशबूची तपासणी केली असता तिला कुष्ठरोग झाल्याचे अनुमान काढले. त्यानुसार तिच्यावर उपचार देखील सुरू केले. तिला कुष्ठरोग झाला नसतानाही कुष्ठरोगाची औषधे दिली. रोज दोन गोळ्या ती घेत होती. या उपचाराचा दुष्परिणाम होऊन २२ जानेवारी रोजी खुशबूचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी अखेर कारवाई करण्यात आली आहे.

### ग्रामसेवकावर कारवाईची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : पालघर जिल्हातील बोर्डी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी इतिवृत्ताची पाने कोरे ठेऊन ते दोषी आढळल्याचे प्रकरण ताजे असतांनाच, ठाणे जिल्हयातील शिरोळे ग्रामपंचायतचे ग्रामसेवक धारासिंग राठोड यांनी १४ महीने मासिक सभेच्या इतिवृताची पाने कोरे ठेवल्याची बाब समोर आली आहे.. याबाबत माहीती अधिकार फाऊंडेशनचे भिवंडी तालुका संघटक रमेश मते यांनी दि.२/१/२०२४ रोजी तत्कालीन गटविकास अधिकारी प्रदिप घोरपडे, विस्तार अधिकारी इंद्रजीत काळे यांचेकडे लेखी तकार केलेली होती व त्या अनुषंगाने ही बाब गांभीर्यने घेऊन तात्काळ चौकशी होऊन कारवाई करणे अपेक्षित होते परंतु ७ महीने उलटूनही काहीही कारवाई होत नसल्याने त्यानंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे यांचेकडे ता. २६/८/२०२४ रोजी लेखी तक्रार केली परंतु तेथूनही काही कारवाई झाली नाही म्हणुन दि.६/१२/२०२४ रोजी मा. कोकण आयुक्त यांचेकडे तक्रार दाखल केली असता सदरचे ५९ पानांचे प्रकरण त्यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे यांचेकडे चौकशीसाठी पाठविले होते परंतु तक्रारदार दि.३/३/२०२५ रोजी जि.प.ठाणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांचेकडे प्रकरणाची चौकशीसाठी गेले असता त्यांनी "तुमचा अर्ज मिळुन येत नाही तुमच्याकडची कॉपी असेल तर आम्हाला दया आम्ही कार्यवाही करू" असे बेजबाबदारपणे उत्तर दिले याबाबत तक्रारदार यांनी नव्याने पदभार स्विकारलेले भिवंडी गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना शिरोळे ग्रामपंचायतचे ग्रामसेवक धारासिंग राठोड हे करत असलेल्या चुकीचे कामांची माहिती दिली तसेच इतिवृत्ताची पाने कोरी असल्याचा पुरावा दिला परंतु उलट गटविकास अधिकारी खामकर यांनी उलट तक्रारदार यांच्यावर कारवाई करण्याची धमकी दिली. तसेच यावरून सबंधित प्रशासन हे प्रकरण दाबून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे याबाबत नव्याने पदभार स्विकारलेले भिवंडी गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तसेच दि.१५/०२/२०२४ रोजी तहसील कार्यालय भिवंडी येथे लोकशाही दिनामध्ये या प्रकरणाची सुनावणी असताना गटविकास अधिकारी खामकर साहेब गैरहजर राहिले तसेच तहसीलदार यांनी या प्रकरणात माहिती पुरवण्याचे आदेश दिले असताना त्या आदेशाला त्यांनी केराची टोपली दाखवली आहे.अशाप्रकारे १४ महिन्यांपासून हे प्रकरण जाणीवपूर्वक दडपून ठेवले आहे.

यावरून कुंपणच शेत खात आहे मग न्यायाची अपेक्षा करायची कोणाकडे? असा संतप्त सवाल रमेश मते यांनी केला असुन याप्रकरणी सखोल चौकशी करून शिरोळे ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक धारासिंग राठोड यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली नाही तर याविरोधात आंदोलनाची भूमिका घेणार असल्याचे रमेश मते यांनी स्पष्ट केले आहे

## स्त्री मुक्ती सामाजिक संस्थेच्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत महिलांचा सहभाग



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महिलांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कल्याण पूर्वेत कार्यरत असलेल्या स्त्री मुक्ती सामाजिक, शिक्षण संस्थेच्या विद्यमाने रविवारी खास महिला वर्गासाठी मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध गटातील महिलांनी उत्सुर्तपणे सहभाग घेतला होता. या स्पर्धेत एक ७२ वर्षीय जेष्ठ महिलेसह कल्याण पूर्व विधानसभा मतदार संघाच्या आमदार सुलभा गायकवाड याही धावल्या.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या महिला मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण पूर्वेतील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रीडांगणा वरून सुरु झालेल्या या स्पर्धेतील स्पर्धक महिलांनी या क्रिडा पटांगणावरून धावण्यास सुरुवात करून या स्पर्धेचा शेवट म्हसोबा चौक येथे करण्यात आला. या स्पर्धेत ७२ वर्षीय सुलोचना इंगळे या जेष्ठ महिलेने उत्सुर्तपणे सहभाग घेवून नारी शक्तीचे दर्शन घडवले. सुलोचना इंगळे यांच्या या मॅरेथॉनमधील सहभागाने नव्या पिढीला प्रेरित केले. वयाच्या या टप्प्यावरही त्यांनी दाखवलेला आत्मविश्वास हा सर्वांसाठीच एक प्रेरणादायी ठरला आहे. या स्पर्धेच्या प्रारंभी आमदार सुलभा गायकवाड यांनी काही अंतर धावून स्पर्धकांमध्ये उर्जा निर्माण केली. स्त्री मुक्ती सामाजिक, शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा वर्षा कळके यांच्य विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह तसेच रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या समयी उपस्थितांना संबोधीत करतांना आमदार सुलभा गायकवाड म्हणाल्या की, ही स्पर्धा केवळ धावण्यासाठी नव्हती, तर महिलांचा आत्मविश्वास, धैर्य आणि सामर्थ्याचे दर्शन घडवणारा हा सोहळा होता. तर या स्पर्धेतून महिलांना आत्मविश्वास, नवी उमेद आणि नवी दिशा मिळो हाच संदेश या स्पर्धेतून देण्याचा आमचा प्रयत्न होता असे विचार स्त्री मुक्ती सामाजिक शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा वर्षा कळके यांनी व्यक्त केले. या स्पर्धेस अखिल भारतीय केमिस्ट अँन्ड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांचे मोलाचे असे सहकार्य लाभले.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाम लागणार

**- माजी खासदार संजीव नाईक**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : देशभरातील 40 विमानतळाचे नामकरणाकरता केंद्र सरकारकडे आले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाम लागणार असून केंद्र सरकाराकडे दुसरे नाव नाही असे माजी खासदार संजीव नाईक यांनी शनिवार 22 तारखेला डोंबिवलीत सांगितले. लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्व पक्षीय कृती समिती आणि अखिल भारतीय आगरी समाज परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार 22 तारखेला प्रगती महाविद्यालयाच्या सभागृहात दि. बा. पाटील योद्धा सन्मान पुरस्कार सोहळा पडला. यावेळी माजी खासदार संजीव नाईक बोलत होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री कपिल पाटील, खासदार संजीव नाईक, जगन्नाथ पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकुर, आमदार राजेश मोरे, माजी आमदार सुभाष भोईर, ठाकरेंची शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, माजी नगरसेवक नितीन पाटील, रवी पाटील, रणजित जोशी, शिवसेना माजी नगरसेवक रमेश म्हात्रे, कॉंग्रेस पदाधिकारी संतोष केणे, कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, तेजस पाटील, जगदीश गायकर, दत्ता वझे, गजानन मंगरूळकर, शरद पाटील, अर्जुनबुवा चौधरी यासह अनेक पदाधिकारी, माजी सरपंच उपस्थित होते. कृती समिती अध्यक्ष दशरथ पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार त्यांची भेट घ्या. अखिल आगरी समाज परिषदेचा सिंहाच वाटा आहे. यावेळी अखिल आगरी समाज परिषदेचे आगरी दर्पण मासिकाचे प्रकाशन मान्यवारांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे खासदार संजीव नाईक म्हणाले, नवी मुंबई विमान तळ नामकणाचा प्रस्ताव हा पंतप्रधानांच्या कार्यालयाने अंतिम कॅबिनेट मंजुरीसाठी आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर नाव देण्याचा अनुषंगाने जो प्रलंबित प्रश्न आहे. तसाच देशातील 40 अशा विमानतळाला नामकरण करण्याच्या संदर्भात काही प्रस्ताव त्या त्या राज्यातून आले आहेत. राज्य सरकारकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांच्या व्यतिरिक्त दुसरे कुठलेही नाव आलेलं नाही. ही आपल्यासाठी फार आनंदाची गोष्ट आहे.

माजी मंत्री कपिल पाटील, विमानतळाबाबत हे आपला प्रस्तावावर काहीही अडचण येणार नाही. फक्त आपले शिष्टमंडळ तिथंपर्यत जाणे गरजेचे आहे. बाळासाहेब ठाकरेंचा नावं बदलू शकत होते कां. पण आपल्या सर्वांच्या एकत्रितपणे आल्याने आपल्या ताकदिने दि.बापाटील नावं लागत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सर्वानी भेट घेऊन सांगायला हवं की विमानतळ झाल्यानंतर नामकरण न होता ते आधी होणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना गळ घालून आपला. विषय पूर्णतःस नेले पाहिजे. भूमिपुत्रांच्या नोकऱ्याबाबत असे आहे की, भूमिपुत्रांनी त्यांना प्रशिक्षण घेतले पाहिजे. भूमिपुत्रांना प्राधान्य देत नोकरी, व्यवसाय देणे आवश्यक आहे. मला मिळालेल्या माहितीनुसार बऱ्याच लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. आपण जर कठोर भूमिका घेत नाही तर मात्र आपण कमी पडू. भूमिपुत्रांच्या पाठीशी आपण उभे राहणे आवश्यक असल्याचे माजी खासदार संजीव नाईक यावेळी म्हणाले.

## पिसवलीमध्ये घडले हिंदू मुस्लिम एकजुटीचे दर्शन

### युवा समाजसेवक अमित कोळेकर यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : युवा समाजसेवक तथा रुग्णसेवक अमित कोळेकर यांच्या द्वारे प्रथमच पिसवली प्रभागातील हिंदू- मुस्लिम बांधवांसाठी ऐकतेचे एकजुटीचे प्रतीक म्हणून इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन पाईप लाईन रोड येथे करण्यात आले होते. सध्या समाजा समाजा मध्ये वाढत असलेला तणाव लक्षात घेता हिंदू मुस्लिम बांधव मतभेद विसरून एकत्र यावे यासाठी या इफ्तार पार्टीचे आयोजन केले असल्याचे अमित कोळेकर यांनी सांगितले. या प्रसंगी बहुतांश बांधवानी इफ्तार पार्टीचा आनंद घेतला. यावेळी आरपीआय जिल्हा कार्याध्यक्ष भारत सोनावणे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) विधानसभा सचिव शमीम शेख, शिवसेना उद्धव ठाकरे गट शहर सचिव शेखर पिसाळ, शहर समन्वयक सागर वाळवे, ज्येष्ठ मार्गदर्शक अशोक गायकवाड, समाजसेवक तन्वीर बागवान, हमीद शेख, वसीम शेख, अब्दुल खान, नवाज शेख, मिर्झा गुलाब बैग, संतोष कराळे, अल्केश पाटील, प्रथमेश पाटील, गणेश पवार, अनिकेत गायकवाड, अमोल गायकवाड, रोहन पनदे, सागर कांबळे, मेघराज हुबाले, अमोल मोरे आदी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सूर्योदय करगाव संघाने पटकावला संत सेवालाल महाराज चषक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त श्री सेवा साई क्रिकेट मंडळ, बदलापूर यांच्या वतीने संत सेवालाल महाराज चषक २०२५ या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. २० ते २३ मार्च या कालावधीत करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन माजी सभापती तुकाराम म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मंडळाचे पदाधिकारी व मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडले. चार दिवस चाललेल्या या स्पर्धेत विविध शहरांतील व खेड्यांतील बंजारा समाजाच्या खेळाडूंनी आणि नामांकित संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

चुरशीच्या वातावरणात सामने पार पडले. अंतिम सामना सूर्योदय करगाव विरुद्ध मोरया ११ भायखळा यांच्यात रंगला. अत्यंत अटीतटीच्या या सामन्यात सूर्योदय करगाव संघाने उत्कृष्ट खेळ करत प्रथम पारितोषिक रु. ५१ हजार व आकर्षक चषक पटकावला. क्रिकेट स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन, खेळाडूंना दिलेल्या उत्तम सुविधा यामुळे ही स्पर्धा अत्यंत यशस्वी ठरली. परिसरातील नागरिक व विविध समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना उत्स्फूर्त प्रतिसाद व शुभेच्छा दिल्या.

ही क्रिकेट स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री सेवा साई क्रिकेट मंडळाने अथक परिश्रम व जिवापाड मेहनत घेतली. शेवटपर्यंत शिस्तबद्ध आणि सुरळीत नियोजनामुळे स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. या क्रिकेट स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे, खेळाडूंचे आणि उपस्थितांचे श्री सेवा साई क्रिकेट मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.

## शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी केली दुर्गाडी किल्ल्याची पाहाणी

### किल्ले दुर्गाडी चैत्र नवरात्र उत्सवाच्या तयारीचा घेतला आढावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शहराचा ऐतिहासिक ठेवा असलेल्या दुर्गाडी किल्ल्याच्या नूतनीकरणाच्या कामाची शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील यांनी रविवारी पाहणी करत किल्ले दुर्गाडी चैत्र नवरात्रौत्सवाच्या तयारीचा आढावा घेतला.

चैत्र नवरात्र उत्सवानिमित्त सालाबादप्रमाणे किल्ले दुर्गाडी नवरात्रौत्सव समिती आणि शिवसेना कल्याण शहर शाखेच्या माध्यमातून चैत्र नवरात्रौत्सव साजरा केला जातो. कल्याण पश्चिम मधील मानाचा ऐतिहासिक दुर्गाडी चैत्र नवरात्रौत्सव अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. याच पार्श्वभूमीवर दुर्गाडी उत्सव समितीचा अध्यक्ष या नात्याने शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील गड किल्ल्यावर सुरू असलेल्या नूतनीकरण कामाची पाहणी केली व संबंधितांना काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे सूचना दिल्या.

तसेच उत्सव काळात किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनासंदर्भात शिवसेना पदाधिकारी, सेवेकरी आणि कार्यकर्त्यांची आढावा बैठक घेतली. याप्रसंगी विभाग प्रमुख मनोहर व्यवहारे, उपविभाग प्रमुख रमेश पाटील, शाखा प्रमुख प्रशांत पाटील, चेतन म्हामुणकर, प्रतिक चौधरी, उपशाखा प्रमुख सुशिल कवटे, महिला उपशाखा संघटक वंदना जळवी, मनाली जाधव, अपर्णा बेलेकर, युवासेना भिवंडी लोकसभा विसतारक सूचेत डामरे, शहरप्रमुख सुजित रोकडे, दिनेश निकम, विधानसभा सोशल मिडीया प्रमुख चेतन कांबरे, युवती सेना स्वाती पाटील, उपविभाग प्रमुख चेतन बळरूगी आदी उपस्थित होते.

## रनर्स क्लॅन फाऊंडेशनतर्फे जाणीव वृद्धाश्रमाला शिधावाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली स्थित रनर्स क्लॅन फाऊंडेशन ही संस्था आपले ब्रीदवाक्य ' क्रीडा स्वास्थ्य एवं समाजसेवा ' राखत वेळोवेळी समाजकार्य करीत आलेली आहे. आणी हीच सामाजिक 'जाणीव ' जपत रनर्स क्लॅन फाऊंडेशनने सलग तिसऱ्या वर्षी श्रीमलंग गडाजवळील आंभेगाव येथील जाणीव वृद्धाश्रमाला शिधावाटप केले. रनर्स क्लॅन फाऊंडेशनने हिरानंदानी बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने दोन महीने पुरेल इतके शिधावाटप सदर वृद्धाश्रमाला केले. या वृद्धाश्रमात जवळजवळ ३५ वृद्ध रहात असुन रनर्स क्लॅन फाऊंडेशनच्या सभासदांनी वृद्धांशी दिलखुलास गप्पा मारल्या आणी त्यांच्या भजनात सामील होऊन आनंद घेतला. सर्व वृद्धांची आपुलकीने काळजी घेणारे वृद्धाश्रमाचे संचालक मनोज पांचाळ ह्यांनी सर्व सभासदांचे आभार मानले आणी दर वर्षी न चुकता आपल्या संस्थेतर्फे शिधावाटप होत असते याचे मनापासून कौतुक केले.

## शाळकरी विद्यार्थ्याची हत्या करणाऱ्याला न्यायालयाने ठोठावली जन्मठेपेची शिक्षा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील नांदेणी गावात एका अठ्ठेचाळीस वर्षाच्या जयवंत बबन भोईर या इसमाने मानवी रक्त पिऊन अघोरी विद्या शिकण्यासाठी चौथीत शिकणाऱ्या मुलाला सात वर्षांपूर्वी कोयत्याने वार करून ठार केले होते. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात याप्रकरणी खटला सुरू होता. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश पी. पी. मुळ्ये यांनी या प्रकरणातील आरोपी ग्रामस्थाला सबळ पुराव्यांचे आधारे जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

या बाबत माहिती अशी की, तालुक्यातील नांदेणी येथील सुरज ज्ञानेश्वर भोईर (११) हा गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेत होता. मयत विद्यार्थी सुरज भोईर याची हत्या करून अघोरी विद्या शिकण्यासाठी २८ मार्च २०१८ रोजी सकाळची शाळा असल्याने सुरज भोईर नेहमीप्रमाणे गावातील शाळेत सकाळी साडे सात वाजता गेला. शिक्षक शाळेत उपस्थित होते. विद्यार्थी आपल्या वर्गांची साफसफाई करत होते. वर्ग खोलीतील झाडलोट केलेला कचरा बाहेर टाकण्यासाठी सुरज भोईर, त्याचा मित्र संदेश हे गेले असता जयवंतने सुरजवर कोयत्याने हल्ला केला आणि तेथुन पळ काढला. नादेणी शाळेतील शिक्षक वैभव भोईर यांनी या प्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी तपास करून जयवंत भोईर याला अटक केली होती. याप्रकरणात शिक्षक, विद्यार्थी असे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. याप्रकरणाचा तपास अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश शिंदे, पोलीस निरीक्षक संदीप गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला होता. याप्रकरणात सरकारी वकील म्हणून अॅड. सचिन कुलकर्णी, अॅड. कदंबिनी खंडागळे यांनी काम पाहिले.

**कचरा टाकून झाल्यानंतर सुरज याला लघुशंका आल्याने तो जयवंत भोईर याच्या पडिक घराजवळ लघुशंका करत होता. त्यावेळी तेथे असलेल्या जयवंत भोईर याने आपल्याला अघोरी विद्या शिकण्यासाठी शिकार मिळाल्याची संधी साधत त्याच्यावर कोयत्याने वार करून त्याची निघृण हत्या केली. सुरजचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणानंतर जयवंत याने स्वतः विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता परंतु पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याने तो वाचला.**

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024